**Proposal of 0.6229 ha. Forest land for lallying underground Optical fiber cable along NH-3 from route section Bhiwandi to Nashik in Taluka Shahapur, Dist. Thane in the state of Maharashtra.**

---

**PART – III**

**(To be filled by the concerned Chief Conservator of Forests)**

| | | |
|---|---|---|
| **14.** | **Whether site, where the forest land involved is located has been inspected by concerned Chief Conservator of Forests (Yes/No). If yes, the date of inspection and observations made in form of inspection note to be enclosed.** | **No** |
| **15.** | **Whether the concerned Chief Conservator of Forests agree with the information given in Part-II and the recommendations of Deputy Conservator of Forests.** | **Agree with the recommendations of the Deputy Conservator of Forests. Shahapur.** |
| **16.** | **Specific recommendation of the Chief Conservator of Forests for acceptance or otherwise of the proposal with detailed reasons.** | **The proposal is recommended for approval.** |

( K. P. Singh )
**Chief Conservator of Forests (T), Thane**

**Date : 94 /12/2015.**
**Place :** THANE
(MAHARASHTRA)

D:\Forest\Desk-10\Site Inspection\site inspection report-Part III.doc

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय
मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in/ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in
महाराष्ट्र वन विभाग

पत्र

विषय – Proposal of 0.6229 ha. Forest land for lallying underground Optical fiber cable along NH-3 from route section Bhiwandi to Nashik in Taluka Shahapur, Dist. Thane in the state of Maharashtra.

जा.क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.५३/१५-१६/जा- 1030 /१५-१६,

ठाणे - ४०० ६०३, दिनांक : १५ / १२ /२०१५.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक या प्रकल्प यंत्रणेच्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वडपे ते गोंदे चौपदीकरण व कसारा घाटात नवीन रस्ता तयार करणेसाठी केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. अशा मंजुरी प्राप्त क्षेत्रात शहापूर वनविभागातील भिवंडी-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ लगत मे. रिलायन्स जिओ, मुंबई या प्रकल्प यंत्रणेकडून भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकणेचे प्रस्तावित आहे. करिता ०.६२२९ हेक्टर वनजमिन मागणी प्रस्ताव Online देखील प्राप्त झालेला आहे.

२.०० वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वनक्षेत्रातून जाणा-या रस्त्याच्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याकरिता खाजगी संस्थांना काही अटी/शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्याबाबत सर्व साधारण मंजुरी देऊन अशा अधिकृत खाजगी संस्थांना परवानगी देण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना केंद्र शासन पत्र क्र. ११-९/९८-एफसी दि. १६/१०/२००० सम क्रमांक दि. ८/४/२००९ आणि राज्य शासन निर्णय क्र. एफएलडी-१०००/प्र.क्र.३०१/फ-१० दि.१३/११/२००० अन्वये उप वनसंरक्षक, शहापूर यांना प्राधिकृत केले आहे.

३.०० विषयांकित प्रस्ताव उप वनसंरक्षक, शहापूर यांचेकडील पत्र क्र. अ/२०/जमिन/१८१० दि. १४/१२/२०१५ अन्वये प्राप्त झालेला आहे. प्रस्तावांतर्गत मागणी केलेल्या वनक्षेत्राचा संक्षिप्त गोषवारा (तपशिल) खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | तालुका | वैधानिक दर्जा | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| ठाणे | शहापूर | राखीव वन | ०.०९३० |
| | | संरक्षित वन | ०.३६५४ |
| | | अंतिमतः संपादीत वन | ०.००६५ |
| | | पुनःस्थापित क्षेत्र | ०.१५८० |
| | | एकूण | ०.६२२९ |

उपरोक्त प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार पाठवावा अगर राज्य शासन निर्णय क्र. एफएलडी-१०००/प्र.क्र.३०१/फ-१० दि. १३/११/२००० अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार सादर करावा याबाबत संभ्रम होता.

केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त क्षेत्रात मे. रिलायन्स जिओ, मुंबई या प्रकल्प यंत्रणेकडून ROW मध्ये OFC टाकणेचे काम करणेत येणार असल्याने, सदर प्रस्ताव राज्य शासनाच्या दि.१३/११/२००० ~~१३/११/२०००~~ रोजीच्या पत्रास अनुसरुन सादर करणेबाबत उप वनसंरक्षक शहापूर यांना कळविणेत आलेले होते.

वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्तावाकामी आवश्यक ते दस्ताऐवज आणि राज्य शासनाच्या दि.१३/११/२००० रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आवश्यक दस्ताऐवजासह प्रस्ताव उप वनसंरक्षक, शहापूर यांजकडून प्राप्त झालेला आहे त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे दस्ताऐवज समाविष्ठ आहेत.

१) कोणत्याही प्रकारचे नियमभंग होणारे कृत्य केले जाणार नाही याबाबतचे उपभेक्ता यंत्रणेचे हमीपत्र.

२) उपभोक्ता यंत्रणेने खोदकाम झालेनंतर जमिनीचे स्वरुप पूर्ववत करुन देण्याबाबत हमीपत्र.

३) वन/पर्यावरणाच्या नुकसानीची भरपाई करण्यास तयार असल्याबाबत उपभोक्ता यंत्रणेचे हमीपत्र.

४) पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक असलेली रक्कम भरणेस तयार असल्याबाबत उपभोक्ता यंत्रणेचे हमीपत्र.

५) महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्र. जमिन-१०/२०००/प्र.क्र.२१/ज-१ दि. २७/४/२००० मध्ये नमूद केलेल्या अटीनुसार प्रकल्प राबवित असलेल्या क्षेत्रातील स्थानिक वनअधिका-यांना २ एम.बी.बॅडनिडथ सेवा निशुल्क पुरविणेबाबत उपभोक्ता यंत्रणेचे हमीपत्र.

६) पार्ट क्र. । ते ।।।.

७) १ हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करणेसाठी लागणारा खर्च देण्यास तयार असल्याबाबत प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र.

८) नक्त वर्तमान मुल्य प्रमाणपत्र व प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र.

९) उप वनसंरक्षक, शहापूर यांचा स्थळपाहणी अहवाल.

१०) प्रस्तावांतर्गत मागणी केलेल्या वनक्षेत्रात वनभंग झालेला नसल्याबाबत उप वनसंरक्षक, शहापूर यांचे प्रमाणपत्र.

वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नाशिक या प्रकल्प यंत्रणेच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वडपे ते गोदे चौपदीकरण कामी केंद्र शासनाकडून अंतीम मान्यता प्राप्त वनक्षेत्रातील, शहापूर वन विभागांतर्गत भिवंडी-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ लगत रत्याच्या कडेने मे. रिलायन्स जिओ, मुंबई या प्रकल्प यंत्रणेकडून ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकणेचे प्रस्तावित असल्याने सदर प्रस्तावाची मंजुरीकामी शिफारस करणेत येत आहे.

सोबत प्रस्तावांचे तीन संच पाठविणेत येत असुन पुढील कार्यवाही होणेस विंनती आहे.

सहपत्र – वरीलप्रमाणे

मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे.

प्रतिलिपी – उप वनसंरक्षक, शहापूर यांजकडे माहीती तथा पुढील उचित कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतिलिपी – मे. रिलायन्स जिओ, तिसरा मजला, मेकर्स चेंबर, ४-२२२, नरिमन पॉईट, मुंबई यांजकडे माहितीसाठी अग्रेषित.

D/Forest/Desk-10/FCA 2015-16/Copy Letter